पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/९५८/२०१३
दिनांक - ०६/०९/२०१३

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक १०/०९/२०१३ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १०/०९/२०१३ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक-७७

दिनांक- १०/०९/२०१३ वेळ- सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १०/०९/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ०३/०९/२०१३ व ०४/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ७६) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१) मनपा क्रिडा विभागाकडील तक्ता क्रमांक १ मधील २ संस्था अनुदान अदा करणेस पात्र झाल्या होत्या. तसेच लेखापाल यांनी प्रस्तावात नमूद १ ते १४ सार्व. संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही असे कळविले असल्याने अपात्र ठरलेल्या आहेत त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व संस्था / मंडळे यांना अनुदान अदा करणेकामी खालील नमुद तक्ता क्र.१ मधील-

| अ.क्र. | सार्व.संस्था/मंडळांचे नांव | अनुदान र.रू. |
|---|---|---|
| १ | साई संस्कार संस्था, आकुर्डी | १,८९,२५२/- |
| २ | सुकन्या मेडीकल फाऊंडेशन, राजनगर, से.नं.२२, निगडी ओटा स्कीम, निगडी, पुणे-४४. | ७,२४७/- |

या अ.क्र.१ ते २ सार्व. संस्था मंडळांना त्यांचे नांवापुढे नमूद केलेप्रमाणे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मा. आयुक्त यांच्या दि.२३/०१/२०१३ व ३०/०३/२०१२ मंजूर प्रस्तावान्वये अनुदान अदा करणेस मान्यता दिल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १०/९/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) मनपाचे विद्यूत उद्यान विभागाकडील सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील तरतूदीचे विद्युत उद्यान व किरकोळ देखभाल दुरूस्ती ह्या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. (वाढ/घट र.रू.४२,४६,०००/-)

(दिनांक १०/९/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३) मनपाचे ब प्रभागातील सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद वाढ-घट करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. (वाढ/घट र.रू.३,३८,५७,०००/-)

(दिनांक १०/९/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.४) मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या इमारतीमधील कॉरीडॉर (कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरुम, मुता-या), अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी सध्या काम करीत असलेल्या मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना पुर्वीच्या झालेल्या करारनाम्यास अधिन राहून ई-निविदा नोटीस क्रमांक-०१/२०१३-२०१४ ची संपूर्ण कार्यवाही होवून नविन निविदाधारकास कामाचा आदेश देई पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जुलै २०१३ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.६) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२९.७.२०१३ ते दि.४.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७४/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.७) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.८.२०१३ ते दि.११.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७५/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.८) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.८.२०१३ ते दि.१८.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७६/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.९) मनपाच्या स्थापत्य (वाहतूक) विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.१६ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील हॉस्पीटल परिसरात नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलंडणेच्या सुविधा तयार करणेकामी मे.प्रिझम एन्टरप्रायजेंस (नि.र.रू.१४,००,५६०/- [र.रू.चौदा लाख पाचशे साठ] पेक्षा ३२.६२ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू.९,९०,८८२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१०) मनपाचे क्रीडा विभागाकडील विषयपत्रानुसार-

१) श्री देवांग गोपाल, क्रिडा मार्गदर्शक (बॉक्सिंग) मानधन र. रू 15000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 15000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 90000/- (अ)

२) श्री विजय रणझुंझारे क्रीडा मार्गदर्शक (रायफल शुटिंग) मानधन र.रू 10000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 10000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 60000/- (ब)

३) श्री लांडगे गणेश, क्रिडा मार्गदर्शक (हॉकी), मानधन र.रू 10000/- प्रतिमहा

प्रमाणे 6 महिने X 10000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 60000/- (क)

४) श्री कपोते नंदकिशार, कला/सांस्कृतिक पर्यवेक्षक/मानद सल्लागार मानधन र. रू. 15000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 15000/- प्रमाणे अपेक्षितखर्च र.रू 90000/- (ड)

क्रीडा विभागाकडील उपरोक्त प्रमाणे मानधनावरील कर्मचा-यांना तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस व उपरोक्त प्रमाणे गत नेमणूकीचे मानधनात वाढ करून येणा-या र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त )खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) स्थानिक संस्था कर विभागाकडे जमा होणा-या रकमांचे लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण होणेसाठी खालील प्रमाणे दोन लेखाशिर्ष व त्यासमोरील तरतुद सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकात नव्याने निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

| | |
|---|---|
| स्थानिक संस्था कर व्याज (LBT Int.) | ५०,०००/- |
| स्थानिक संस्था कर दंड (LBT Penalty) | ५०,०००/- |
| **एकुण** | **१,००,०००/-** |

विषय क्र.१२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन "मुख्यसमन्वय" यापदाचे कामकाजाकरीता खालील निवड यादीतील उमेदवारांस त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या एकत्रित मानधनावर अकरा महिने कालावधीसाठी तात्पुरती स्वरुपाचे नियुक्तीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

| | उमेदवाराचे नाव | पदनाम | प्रतिमहा एकत्रित मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल | मुख्यसमन्वय | २०,०००/- |

विषय क्र.१३) मनपाचे अग्निशामक विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागास शासनाकडून प्राप्त झालेले र.रु ५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख फक्त) शासकीय सहाय्यक अनुदानाचा विनीयोग योग्य रितीने होणेकामी "बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन अनुदान" या नावे तुर्त अग्निशामक विभागमध्ये नविन लेखाशिर्ष व त्यांचे स्वतंत्र खाते निर्माण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) मा.शहर सुधारणा समिती सभा दिनांक २६/०८/२०१३ ठराव क्र.२७ नुसार, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे / अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर 'नो पार्कींग' झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क

मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व ' नो पार्कींग ' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५) मनपाचे विद्युत विभागासाठी तातडीने प्रस्तावात नमुद लॅम्प साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.१०/१/२०१३-१४ अन्वये लघूतम निविदाकार मे.एन.एस.जैन अँन्ड कं.प्रा.लि.पुणे यांचे विविध लॅम्प साहित्याचे दर एकुण र.रू.१०,३३,५००/- स्विकृत करून, करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्र.१६) महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम १०३ अन्वये वैद्यकीय विभागाकडील “स्थायी आस्थापना”या लेखशीर्षाचे र.रु.४०००००००/-तरतुदीमधून “गणवेष शिलाई” (परिशिष्ट ‘ब’)या लेखाशीर्षामध्ये र.रु.१५००००/-व यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय या विभागाकडील “स्थायी आस्थापना”या लेखाशिर्षाचे र.रु.२८००००००/-तरतुदी मधून “गणवेष शिलाई” (परिशिष्ट ‘ब’)या लेखाशीर्षामध्ये र.रु.१०००००/-एवढी तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अनू.क्र. | विभागाचे नाव | गणवेष देय कर्मचारी संख्या | अपेक्षित खर्च | स्थायी अस्थापना या लेखशिर्षावरील तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीयमुख्य कार्यालय | ४३९ | १५००००/- | ४०००००००० |
| २ | यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय | २७४ | १०००००/- | २८००००००० |

विषय क्र.१७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे विविध विषयांवरील देखाव्यांच्या स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या स्पर्धेअंतर्गत विजेत्या मंडळास धनादेशाद्वारे बक्षिसांची रक्कम अदा करुन व प्रशस्तिपत्रक देवून सत्कार केला जातो. त्याप्रमाणे यावर्षीही सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. याकरीता थेट पध्दतीने र.रु. २,२०,५००/- (अक्षरी र.रु. दोन लाख वीस हजार पाचशे ) इतका खर्च धनादेशाद्वारे होणार असून तसेच शांतता बैठकीबाबत रंगमंदिर भाडे, फ्लेक्स, बॅनर, स्पर्धेच्या परिक्षण समितीचे मानधन, चहापान, भोजन इ. व्यवस्थेकरीता व गणेशविसर्जनाचे दिवशी पत्रकारांचे भोजन व्यवस्थेकरीता र.रु.८०,०००/- (अक्षरी र.रु. ऐंशी हजार फक्त) इतका रोख स्वरुपात खर्च होणार असून एकूण र.रु. ३,००,५००/- (अक्षरी र.रु. तीन लाख पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) मनपाचे विविध विभागाकडील 2500 नग ओळखपत्र अल्पमुदत ई नि.सु.क्र.09/2012-13 मे. कापसे एंटरप्रायजेस, पिंपरी वाघेरे यांचेकडुन दर र.रु. 64/- प्रती नग प्रमाणे छपाईकामी येणा-या र.रु.1,60,000/- खर्चास व त्याचबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१९) अंध असलेले अपंगाना त्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्राची/दाखला मागणी केल्यास त्यांचेकडुन अपंग असलेबाबतचे कागदपत्रांची पडताळणी करुन व शारिरिक तपासणी करुन व नियमानुसार मनपाची फी आकारुन त्यांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करणे व वैद्यकीय तपासणी करताना सर्व तपासण्या उदा. रक्त, लघवी, थुंकी तपासणी फी, एक्सरे फी, सोनोग्राफी फी, अशा प्रकारच्या सर्व तपासण्या मोफत करणेस मान्यता देणे परंतु तपासणी फी (केस पेपर व केसपेपर सोबतची सल्ला फी) व दाखला माफ असणार नाही. सदरचा विषय मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) **मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१३ अन्वये, जलक्षेत्र क्र.३/१३ दापोडी येथे पाण्याचे टाकीचे आवारात ५ ल.लि. क्षमतेची संपवेल बांधणेकामी मे.मंगलदास इन्फ्राटेक प्रा.लि.** (नि.र.रू. २५,८३,३४१/- पेक्षा ६.१० % जादा (चालू दराशी तुलना करता १५.७८% ने कमी)) (भाव वाढ फरक कलमासह) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) **मनपाच्या** विद्युत विभागांतर्गत शुद्ध अशुद्ध जलउपसा केंद्र से.२३ विभागाकडील भांडवली कामे लेखाशिर्षकांतर्गत नविन कामाच्या पुर्णत्वासाठी अंतर्गत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. (वाढ/घट र.रू.२४,००,०००/-)

विषय क्र.२२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे संरक्षणात्मक परिक्षण (Structural Audit ) अनिवार्य करणेबाबतच्या अधिनियमात केलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६५ (अ) प्रमाणे अंमलबजावणी करणेसाठी बांधकाम अभियंता पॅनेल नेमणूक करणेकामी **प्रस्तावात नमुद** केलेप्रमाणे सदर प्रपत्र ब व क चे अवलोकन होऊन पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील मनपाच्या मिळकती अथवा जुन्या मिळकतींना ३० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट पहिल्या टप्प्यात करणे व दुस-या टप्प्यात महापालिकेची

ज्या-ज्या ठिकाणी महत्त्वाची कार्यालये अथवा इमारती आहेत अशा महापालिकेच्या महत्वाच्या मालमत्तांचे व कार्यालयीन रेकॉर्ड नैसर्गिक आपत्तीपासुन व इतर संभावित धोक्यापासुन संरक्षित करण्याकरीता म.न.पा.ने नोंदणीकृत “बांधकाम अभियंता” यांचेमार्फत करणे आवश्यक असल्याने या कामी “बांधकाम अभियंता” यांची नेमणूक करण्यास तसेच प्रस्तावासोबत जोडलेल्या दरसूचीतील दरांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मनपाच्या स्थापत्य (वाहतूक) विभागाकडील नि.नो.क्र.अमुख्यालय/HO/१४/ २०१२-१३ मधील अ.क्र.०७ अन्वये, नविन प्रभाग क्र.१७ मधील से.क्र.२६ व २७ मधील अंतर्गत रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे. सांडभोर कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२२,४०,८९६/- [र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे शहान्नव] पेक्षा २७.२८ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. १७,११,०५९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२४) स्वाईन फ्ल्यु रूग्णांकरिता आवश्यक Syp Fluvir 75ml. अंदाजे ५०० बॉटल्सचे अधिकृत विक्रेते मे.निरामय ड्रग स्टोअर, चिंचवड यांचेकडुन टप्प्या-टप्प्याने आवश्यकतेनुसार थेट पध्दतीने खरेदीकामी येणा-या र.रू.**२,१८,५००/-** चे खर्चास व सन २०१३-१४ साठी मागणीनुसार तातडीने खरेदी करणेकामी येणा-या पुढील प्रत्यक्ष खर्चास व खरेदीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) मनपाच्या स्थापत्य (वाहतूक) विभागाकडील नि.नो.क्र.अमुख्यालय/HO/१४/ २०१२-१३ मधील अ.क्र.२४ अन्वये, नविन प्रभाग क्र.१४ मधील से.क्र.२४, २५ व २६ मधील अंतर्गत रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.रेणूका कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२२,४०,८९६/- [र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे शहान्नव] पेक्षा २७.७५ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. १७,००,०००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१३-१४ मधील अ.क्र.०१ अन्वये, निगडी से.२३ जलशुध्दीकरण केंद्रासाठी आवश्यक असणारे द्रवरूप पॉली अॅल्युमिनियम क्लोराईड ९४१.४० मे.टन मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून व ६२७.६० मे.टन मे.केमिकल पीपल यांचेकडून र.रू.१२,६०० प्र.मे.टन या दराने खरेदी करणेकामी त्यांचेशी करारनामा करणेस व सदर खरेदीसाठी येणारा खर्च र.रू.१,९७,६९,४००/- यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) मे. सृजन कम्युनिकेशन, नांदेड यांनी 10 कलमी कार्यक्रमांतर्गत फोर कलर पुस्तिका आकर्षक व उत्तम छपाई करुन दिलेले असलेने त्यांचे काम समाधानकारक आहे. तरी

वाढीव 08 पानाचे बिल र.रु. 21500/- व ट्रान्सपोर्ट चार्जेस र.रु. 7000/- असे एकुण र.रु. 28500/- अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२८) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये सुधारित मंजुर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे, ता. हवेली येथील स.नं.७ पै., २२४ पै.,२२५ पै. या जागेवरील १८.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित क्षेत्र भूसंपादन करणेकामी, सदर रस्त्याकरिता भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविणे करिता मा.महापालिका सभेने दि.२७/०६/२०१३ रोजी ठराव क्र.३०३ अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्तुत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम अन्वये भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याच्या भूसंपादनासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२९) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पंपिंग स्टेशनवर पंप ऑपरेटर ठेकेदार पध्दतीने पुरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.९९,८८,३८४/- पेक्षा ३.४१९ % कमी (किमान वेतन दराची)) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३०) मनपाच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र.१३ वरील स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षामधील पृष्ठ क्र.३३ अ.क्र.१४ वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्कींग जागा ह्या १ ते १४४ कामांच्या यादीत नाशिक फाटा उड्डानपुलाच्या सुशोभिकरणासाठी एल.ई.डी. दिवे वापरून प्रकाश व्यवस्था करणे या कामाच्या नावाचे स्वतंत्र उपलेखाशिर्ष निर्माण करुन पृष्ठ क्र.४७, अ.क्र.१२६ येथील नाशीकफाटा उड्डाणपुल येथे पादचा-यांसाठी FOB व इतर अनुषंगीक कामे करणे या कामासाठी केलेल्या र.रु. ८ कोटी या तरतुदीमधुन र.रु.६२ लाख इतकी तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३१) मोटार वाहन अपघात दावा क्रमांक ७८०/११ आणि दावा क्रमांक ७८१/११ मधील उर्वरीत नुकसान भरपाई अदा करणेकामी, दावा क्रमांक- ७८०/११ मध्ये नुकसान भरपाई र.रु.४,४०,०००/- चे अर्धी (५०%) उर्वरीत र.रु.२,२०,०००/- व त्यावर दाव्याची तारीख २४/०६/२०११ पासून ते दिनांक ३०/०९/२०१३ अखेर प्रतिवर्षी ६% दराने व्याज र.रु.२९,९८०/- अशी नुकसान भरपाईपोटी व्याजासह र.रु.२,४९,९८०/- व दावा क्रमांक- ७८१/११ मध्ये नुकसान भरपाईपोटी र.रु.९,९७,२००/- चे अर्धी (५०%) उर्वरीत र.रु.४,९८,६००/- व त्यावर दाव्याची तारीख २४/०६/२०११ पासून ते दिनांक ३०/०९/२०१३ अखेर प्रतिवर्षी ६% दराने व्याज र.रु.६७,९४७/- अशी नुकसान भरपाईपोटी व्याजासह र.रु.५,६६,५४७/- मोटार अपघात न्यायाधिकरण-VII विजापूर, यांचेकडे जमा करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८८,ह(दोन) च्या तरतुदीनुसार सदर उपरोक्त उर्वरीत नुकसान भरपाई महानगरपालिका निधीतुन अदा करणे आवश्यक आहे. सदर उर्वरीत नुकसान भरपाई देणेकामी मे.न्यायाधिकरणाने दाव्याचे तारखेपासून प्रतिवर्षी ६% दराने व्याज देणेचा निर्णय दिल्याने रक्कम लवकरात लवकर अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उर्वरीत नुकसानभरपाईची रक्कम अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३२) मनपाच्या विद्युत ड प्रभाग कार्यक्षेत्रातील चालु पुर्ण तथापी मनपा अंदाजपत्रक सन १३-१४ मधे समाविष्ठ असलेल्या लेखाशिर्षानिहाय कामांसाठी विभागातंर्गत प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे तरतुद र.रु.९३ लक्ष वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागांतर्गत रहाटणी येथे दवाखाना (प्राथमिकआरोग्यकेंद्र) कार्यरत असून तेथील रुग्ण संख्या महानगरपालिकेच्या इतर दवाखान्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे तसेच सदर परिसरातील रुग्णसेवेसाठी पिंपळेसौदागर दवाखाना व जिजामाता रुग्णालय हे रहाटणी दवाखान्याच्या जागेपासून जवळ असल्याने रहाटणी दवाखाना बंद करुन महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या पुनावळे येथे नवीन दवाखाना सुरु करणेबाबत तसेच रहाटणी येथे सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना बदलीद्वारे पुनावळे दवाखान्या मध्ये नेमणूक करणेस मा.आयुक्त यांनी सूचीत केलेले आहे. पुनावळे दवाखान्यासाठी पुनावळे येथील महानगरपालिका शाळेतील चार खोल्या वैद्यकीय विभागाच्या ताब्यात मिळालेल्या आहेत. तसेच तेथील स्थापत्य विषयक कामे स्थापत्य विभागाकडून पूर्ण करणेत आलेली आहे. त्यानुसार पुनावळे दवाखाना लवकर सुरु करणे शक्य होईल. तरी रहाटणी दवाखाना बंद करुन पुनावळे येथे नव्याने दवाखाना सुरु करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तालेरा रुग्णालयाकरीता व वाय.सी.एम.रुग्णालयाकरीता आवश्यक लागणारे A-Scan Machine व Portable ECG Machine खरेदी करणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदा क्र. ०२/२०१२-१३ मधील प्राप्त लघुत्तम दरानुसार १ नग A-Scan Machine मे. मनाली एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु. २,६६,१४२/- प्रतिनग व वाय.सी.एम. व इतर रुग्णालयांकरीता आवश्यक लागणारे ५ नग Portable ECG Machineमे. एस.बी.एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु. २६,१४०/- प्रतिनग या दराने र.रु. १,३०,७००/- असा एकूण मिळून र.रु. ३,९६,८४२/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/९५८/२०१३
दिनांक - ०६/०९/२०१३

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.